**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अपुर्ण विहिरी पुर्ण करण्यातील अडचणी शोधून उपाययोजना सुचविण्यासाठी तांत्रिक समिती गठीत करणेबाबत**

महाराष्ट्र शासन,
नियोजन (रोहयो) विभाग
क्रमांक:- मग्रारोहयो/प्र.क्र.०७/मग्रारो-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-30 जानेवारी, २०१५

**शासन आदेश**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अपुर्ण विहिरी पुर्ण करण्यातील अडचणी शोधून उपाययोजना सुचविण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तांत्रिक समितीची स्थापन करण्यात येत आहे:-

**तांत्रिक समितीची संरचना :**

| | |
|---|---|
| १) श्री एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, नाशिक | : अध्यक्ष |
| २) संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | : सदस्य |
| ३) श्री उदय पाटील, अधिक्षक कृषि अधिकारी, नरेगा आयुक्त कार्यालय, नागपुर | : सदस्य |
| ४) उपजिल्हाधिकारी (रोहयो), नाशिक | : सदस्य सचिव |
| ५) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक | : सदस्य |
| ६) सर्व कार्यकारी अभियंता, विभागीय आयुक्त कार्यालय | : सदस्य |
| ७) श्री एस.आर. मालपाणी, शाखा अभियंता, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : सदस्य |
| ८) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले दोन सदस्य | : सदस्य |

२. सदर तांत्रिक समितीने अपुर्ण विहिरी पुर्ण करण्यातील अडचणी काय आहेत व त्यावरील उपाययोजना काय आहेत याचा अभ्यासपूर्ण अहवाल प्रचलित कायद्याच्या तरतूदी विचारात घेवून तयार करावा व शासनास १ महिन्याच्या कालावधीत अहवाल सादर करावा .

३.	या करीता सदर समितीने राज्यातील विविध भागात दौरे करून व संबंधित अधिकाऱ्यांशी/लाभार्थ्यांशी चर्चा करून योजना कार्यान्वयानातील/अंमलबजावणीतील अडचणी शोधाव्यात तसेच त्यावर कायद्याच्या चौकटीत उपाय योजना सुचवाव्यात.

४.	समितीच्या बैठका, अभ्यास दौरे इत्यादी बाबत होणारा खर्च हा महात्मा गांधी नरेगाअंतर्गत अनुज्ञेय ६% प्रशासकीय खर्चातून भागवावा.

30/1/2015

**( आर.विमला )**
**उप सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन**

प्रत-:

१) विभागीय आयुक्त (सर्व)

२) आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपुर

३) जिल्हाधिकारी (सर्व)

४) संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

५) श्री उदय पाटील, अधिक्षक कृषि अधिकारी, नरेगा आयुक्त कार्यालय, नागपुर

६) उपजिल्हाधिकारी (रोहयो), नाशिक

७) सर्व कार्यकारी अभियंता, विभागीय आयुक्त

८) श्री एस.आर. मालपाणी, शाखा अभियंता, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

९) प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक यांना माहितीसाठी सादर.

D:\2015\EGS 1\2015C.R.07.meeting.docx.docx